# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-७७ दिनांक - ०५/०३/२०२४

## प्रेसनोट

### संघटीतपणे गंभीर गुन्हे करणा-या सराईत अंतरराज्यीय टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार कडुन कारवाई.

-------ooooo-------

दिनांक ०७/०१/२०२४ रोजी दरोडयाची पुर्वतयारीत असलेले कुख्यात अंतरराज्यीय टोळीतील आरोपीत नामे- १) मनिष ऊर्फ राजु मोहन चव्हाण, रा. ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. २) भाऊसाहेब शंकर गवळी, रा. ता. नेवासा, जि. अहमदनगर. ३) रविंद्रसिंग सुखराम सोलंकी, रा. जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश. ४) सुखचेन रेवत पवार, रा. जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश. ५) मॉन्टी नंदु चौहान, जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश ६) अश्विनी रुपचंद चव्हाण, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर यांना गुन्हे शाखा कक्ष -३ चे अधिकारी व अंमलदार यांनी कारवाई करुन ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर व कलम १३/२०२४, भा.दं.वि.सं. कलम ३९९, ४०२, ३५३, ३३२ सह आर्म ॲक्ट ४, २५, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (१) (३), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद आरोपीत यांनी संघटीतपणे टोळी तयार करुन महाराष्ट्र राज्यातील, पालघर, ठाणे, नाशिक, पुणे, सांगली, अहमदनगर, औरंगाबाद, तसेच मध्यप्रदेश व राजस्थान परिसरात खुन, खुनासह दरोडा, सशस्त्र दरोडा, हत्येचा प्रयत्न, जबरी चोरी, घर फोडी, चोरी असे अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असुन आरोपी नामे - १) सुखचेन रेवत पवार, २) रविंद्रसिंग सुखराम सोलंकी हे सन २०१८ पासुन राजस्थान व मध्यप्रदेश येथील दरोडयाच्या गुन्हयात फरार इनामी गुन्हेगार असुन सदर गुन्हयाचे तपासात नमुद अटक आरोपीत यांचे कडुन पोलीस कोठडी दरम्यान मालमत्ते संदर्भाचे ७ गुन्हे उघडकीस आले आहे.

नमुद आरोपी यांचे विरुध्द दिनांक २९/०२/२०२४ रोजी मा. श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो., मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे परवानगीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) अशी कलम वाढ करण्यात आली असुन उक्त गुन्हयाचा तपास मा. श्री. श्री. मदन

बल्लाळ,सहाय्यक पोलीस आयुक्त सो., गुन्हे, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय हे करीत आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम - सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

।।।।।